क्रमांक :पोअव/आशा-४/पोयंचा-शेख/पदोन्नती-कार्यमुक्त/ 10776 /२०१९, वाशिम दिनांक 3 JUL 2019

संदर्भ :- मा. अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश क्रमांक जा.क.ई-५/प्रलि-१/पोहवा यंचा ते सपोउपनि प्रयंचा/पदोन्नती/२०१९/२६२०, दिनांक ३०/०५/२०१९.

**विषय :- पदोन्नती बाबत ...**

पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (प्रमुख यंत्रचालक)

---०००---

**आदेश :-**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमुद पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) यांना सहाय्यक पोलीस उप निरीक्षक (प्रमुख यंत्रचालक) या पदावर कार्यभार स्विकारल्याचे दिनांकापासून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच त्यांची पदोन्नतीवर नेमणुक नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी / घटकात करण्यात आल्या आहे.

संगणक

| अ.क्र. | पोलीस हवालदार यंत्रचालक यांचे नाव व जातीचा प्रवर्ग | सद्याची नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नती प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| २. | शेख गूलाब अब्दुल मुनाफ | पोलीस अधिक्षक, वाशिम | पोलीस अधिक्षक, हिंगोली | खुला | रिक्त पदी |

२/- वर नमुद पोलीस हवालदार (यंत्रचालक) यांना सदरची पदोन्नती स्विकारण्याबाबत सहमती दर्शविल्याने त्यांना या आस्थापनेवरून पदोन्नतीच्या ठिकाणी रुजु होण्याकामी या आस्थापनेवरुन **दिनांक ४/०७/२०१९ रोजीच्या मा.नंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे**. नमुद पोलीस हवालदार(यंत्रचालक) यांना देण्यात आलेली सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, बि.सं.(प्रमुख यंत्रचालक) पदावरील तात्पुरती पदोन्नती ही खालील अटींच्या अधिन राहुन देण्यात आली आहे.

१) नमुद कर्मचारी यांच्यावर कोणतीही विभागीय चौकशी /न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावी.

२) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही /२०१५/प्र.क्र.३१०/कार्या,१२ दिनांक १५/१२/२०१७ च्या मधील १ ते १९ तरतुदी अन्वये विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत असलेल्या कर्मचारी पदोन्नती देताना अवलंब करावयाच्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही घेण्यात येईल.

३) समान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१७/ए-१६ब, दि.२९/१२/२०१७ अन्वये देण्यात आलेल्या आदेशानुसार सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या विशेष अनुज्ञेय याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील निर्णयाच्या अधीन राहुन पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर जेष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयाच्या अनुषंगाने प्रमुख यंत्रचालक पदाची निवडसुची, तसेच जेष्ठता सुची सुधारीत झाल्यास पदोन्नत होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे जेष्ठतासुचीतील स्थान खाली जाणे अथवा पदावतन होणे याबाबी उदभवू शकतात याची नोंद घ्यावी.

४) सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना असाधारण क्रमांक १०९/दिनांक २९ मे २०१८ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४६२/कार्या १२ दिनांक ०३ जुलै २०१८ अन्वये शासन सेवेतील गट अ,ब,क,संवर्गातील पदांवर नियुक्तीसाठी संगणक हाताळणे /वपराबाबत चे ज्ञान असणे आवश्यक आहे. या पुढे संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान या संदर्भातील विहीत प्रमाणपत्र सादर न केल्यास वेतनवाढ रोखणे / पदोन्नती रोखणे या सारख्या करावयाच्या कार्यवाही संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळ-

//२//

-णी /वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) (सुधारणा) नियम २०१८ मधील तरतुदी विचारात घ्याव्यात असे निर्देश आहेत. पदोन्नती आदेश निर्गमित करते वेळी पदोन्नती होण्याऱ्या कर्मचाऱ्यांकडुन **(वयाच्या ५० वर्ष पुर्ण केलेले कर्मचारी सोडुन )** संगणक हाताळणी वापराबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतरच त्यांना पदोन्नतीवर सोडण्यात यावे असे निर्देश असल्याने नमुद कर्मचारी यांचे ५६ वर्ष असल्याने त्यांचे संगणक प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

५) पदोन्नती नंतर कनिष्ठ पदातील वेतनवाढी नंतर वेतननिश्चिती करीता दयावयाच्या विकल्पासंबंधी शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वेपुर १२९८/प्र.क्र.१३/९८/संवा-१०/दि.१०/१२/१९९८ च्या आदेशाची माहिती सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बिनतारी संदेश (प्रमुख यंत्रचालक) या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांस दयावी असा विकल्प दयावयाचा असेल तर त्यांनी पदोन्नती मिळाल्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत असा विकल्प दयावा मुदतीत विकल्प न आल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही. व त्यांची वेतननिश्चिती म. ना. से. (वेतन) नियम -१९८१ नियम क्र.११ (एक) (ए) प्रमाणे करण्यात येईल याची संबंधीतास समज दयावी.

६) कालबध्द पदोन्नती घेतली असल्यास संबंधीत कर्मचाऱ्यास पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती अनुज्ञेय असणार नाही संबंधीत कर्मचारी पदोन्नती नाकारल्यास स्विकारण्यास तयार नसतील तर त्यांची कालबध्द पदोन्नती (वरिष्ठ वेतन श्रेणी) काढुन घेण्यात, येईल याची समज दयावी. तसेच संबंधीत पोलीस हवालदार/ बिनतारी यंत्रचालक यांनी सन २०१८-१९ चे मत्ता व दायित्व या कार्यालयाकडून घेण्यात आले आहे.

७) सदरची नियुक्ती महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २२(२) मधील तरतुदी नुसार पदोन्नतीवर दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना करण्यात आली आहे.

३/- नमुद पोहवा/यंचा.,शेख गुलाब अब्दुल मुनाफ नेमणुक बिनतारी संदेश विभाग, वाशिम यांना नमुद केलेलया दिनांकास कार्यमुक्त करुन त्याबाबतचा पुर्तता अहवाल उलट-टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

**( वसंत परदेशी )**
भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

पोलीस निरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, वाशिम.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना :-

प्रमुख लिपीक लेखाशाखा/पत्रव्यवहार शाखा/वेतन लिपीक-१/भनिनि.लिपीक/प्रवास भत्ता लिपीक/गट विमा योजना लिपीक/इमारत लिपीक/वि.चौ.लिपीक/पेन्शन लिपीक/संगणक कक्ष/डिपीजी.,लिपीक पोलीस अधीक्षक, कार्यालय वाशिम.

प्रत माहीतीस :-

पोहवा/यंचा.,शेख गुलाब अब्दुल मुनाफ नेमणुक बिनतारी संदेश विभाग, वाशिम.

मार्फत व प्रत :- पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग, वाशिम.

प्रत सस्नेह अग्रेषित :-

मा.पोलीस अधीक्षक बिनतारी संदेश पुर्व विभाग, नागपुर.

प्रत माहीतीस्तव सविनय सादर :-

मा.अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.